आजचा दिनविशेष
१९९९ : सोनाली बॅनर्जी भारताची पहिली महिला सागरी अभियंता बनली.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र | वर्ष ३ रे | बुधवार २७ ऑगस्ट २०२५ | अंक २४७ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु







# तरी मी जाणारच,मुंबईत आंदोलन करण्यास हायकोर्टाची मनाई असताना पाटलांचा निर्धार कायम

मराठा आरक्षणावरून राज्यात पुन्हा एकदा वातावरण तापलं आहे, मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलनाची हाक दिली आहे, मनोज जरांगे पाटील यांचं मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलन होणार होतं, मात्र त्यापूर्वीच मोठी बातमी समोर आली आहे, ती म्हणजे हाय कोर्टानं मनोज जरांगे पाटील यांना आझाद मैदानावर आंदोलन करण्यास मनाई केली आहे. त्यानंतर मनोज जरांगे पाटील नेमकी काय भूमिका घेणार याकडे संपूर्ण राज्याचं लक्ष लागलं होतं. अखेर आता मनोज जरांगे पाटील यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. मनोज जरांगे पाटील हे आपल्या आंदोलनावर ठाम आहेत, आमचा न्याय देवतेवर पूर्ण विश्वास आहे, आम्हाला न्याय मिळेल, आमच्या वकील बांधवांची टीम आहे ते कोर्टात जातील असं यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. दरम्यान आंदोलन आणि मराठा आरक्षणावर प्रतिक्रिया देताना मनोज जरांगे पाटील यांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला होता, यावर आता मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जरांगे पाटील यांना प्रत्युत्तर दिलं आहे.



आम्ही लोकशाही पद्धतीने आंदोलन करणार आहोत आणि लोकशाही पद्धतीने करण्यात येणारं आंदोलन कधीही रोखता येत नाही. सरकारने गोर गरिबाच्या भावनांशी खेळू नये, असं वक्तव्य मनोज जरांगे पाटील यांनी केलंय. मुंबई हायकोर्टाने मनोज जरांगे पाटील यांना मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलन करण्यास परवानगी नाकारली आहे. तर नवी मुंबईत खारघर किंवा इतर ठिकाणी सरकार परवानगी देऊ शकतं पण आझाद मैदानावर नाही, असं मुंबई हायकोर्टाने म्हटलं आहे. मुंबई हायकोर्टाने दिलेल्या या आदेशावर मनोज जरांगे पाटील यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे.




पुढे ते असेही म्हणाले की, मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलनास परवानगी नाकारली जाते आणि नवी मुंबई खारघर इथे परवानगी दिली जाते. मग आझाद मैदानावर काय प्रॉब्लेम आहे? न्यायालयाचा सन्मान करणारे लोकं आहोत. कायद्याच्या नियमात राहून अर्ज करून परवानगी मागितली आहे. त्यामुळे शंभर टक्के आम्हाला न्यायालयाकडून परवानगी मिळणार, असा विश्वास जरांगे पाटलांनी व्यक्त केला.

## पश्चिम महाराष्ट्रातील नेत्यांनी बीड जिल्ह्यामध्ये येऊन जातीय तेढ निर्माण करू नका,


### बीड जिल्ह्याचे धनगर समाजाचे नेते आनंद काळे यांनी लक्ष्मण हाके यांना दिला इशारा,

बीड प्रतिनिधी अंकुश गवळी बीड जिल्ह्यामध्ये पश्चिम महाराष्ट्रातील नेत्यांनी येऊन जिल्ह्यामध्ये जातीय तेढ निर्माण करू नका ,धनगर समाजाची मुळात मागणी एसटी आरक्षणाची आहे ,आपण ओबीसी च नेतृत्व करत आहात लक्ष्मण हाके तुम्ही पश्चिम महाराष्ट्रातले आहेत, तुम्ही पश्चिम महाराष्ट्रातून पाचशे किलोमीटर अंतर पार करून तुम्हाला बीड जिल्ह्यामध्ये जातीय दंगली निर्माण करायचे आहेत का, तुम्ही बीड जिल्ह्यामध्ये जातीय तेढ निर्माण करू नका, तुम्ही माजलगावचे विद्यमान आमदार प्रकाश सोळंके व गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित यांच्यावर टीका केली आहेत ते आम्ही कदाचित खपवून घेणार नाहीत, व आमचा मराठा समाजाला जाहीर पाठिंबा आहे , असे विधान धनगर समाजाचे नेते आनंद काळे यांनी थेट लक्ष्मण हाके यांना इशारा दिला आहे, त्यामुळे तुम्ही बोलताना जरा



बीड जिल्ह्यातील लोकप्रतिनिधीचा विचार करून बोलत जावा व धनगर समाजाचा एसटी आरक्षण संदर्भात आपली भूमिका काय आहे व धनगर समाजाला वेड्यात काढण्याचे काम तुम्ही करू नका समाज हुशार आहे तुम्ही ओबीसी समाजाच्या जीवावर राजकारण करू नका तुम्हाला जे राजकारण करायचं आहे तुम्ही ते पश्चिम महाराष्ट्रात करा बीड जिल्ह्यात येऊन तुम्ही तुमची राजकीय पोळी भाजू नका असा रोख इशारा माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे धनगर समाजाचे नेते आनंद काळे यांनी दिला आहे,

## मानाचा युवराज गणेश मित्र मंडळाची कार्यकारिणी जाहीर



कडा (प्रतिनिधी) येथील मानाचा गणेश मंडळ म्हणून ओळख असलेला बाराभाई गल्लीतील मानाचा युवराज गणेश मित्र मंडळाची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. युवराज गणेश मित्र मंडळ हे गत ५५ वर्षांपासून सार्वजनिक गणेशोत्सव परंपरा जोपासत आले आहे. गणेशोत्सव सोहळा २०२५ साजरा करण्यासाठी मंगळवार रोजी दुपारी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत सर्वानुमते पुढीलप्रमाणे कार्यकारिणी निवडण्यात आली. अध्यक्ष पदी सुरेश उर्फ बाबु तारू, उपाध्यक्ष पदी महेश दळवी तर सचिवपदी सागर बोराटे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी मंडळाचे पाच वेळेस अध्यक्ष पदी राहणारे पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते रहेमान सय्यद,घन;शाम ढोबळे पाटील, पोलिस उपनिरीक्षक किरण राऊत,आल्ताब शेख,अविनाश ढोबळे,विघ्नेश तारू, शुभम तारू,आरबाज तांबोळी, शिवम इंगवले,आरिफ शेख,ओंकार जठाडे,सलमान सय्यद, विशाल बोराटे,निलेश ढोबळे, आदित्य मोरे, गणेश जठाडे,आवेज पठाण,दर्शन दळवी,मुसेब पानसरे,महेश होळकर,प्रसाद नांगरे,आयान शेख,केतन खंदारे,विक्रम तारु,शिवम तारु, मोईन शेख,अलतमश सय्यद, तन्वीर खान,आकिब खान,सागर खामट,शोएब पानसरे,मुस्तफा सय्यद,रूषी थेटे,आनंद पाचारणे,सह आदी सदस्य उपस्थित होते.

## माजेद सरांच्या विद्यार्थी पुन्हा ठरले चॅम्पियनस




औरंगाबाद येथे दिनांक . २४ ऑगस्ट. रविवार रोजी पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय खुले कराटे चॅम्पियनशिप मध्ये सेल्फ डिफेन्स मार्शल आर्ट अकॅडमी माजलगाव चे १५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता या स्पर्धांमध्ये श्रीलंका. विदेशातून व आपल्या भारतातून एकूण ३७५ विद्यार्थी सहभाग झाले होते व या सर्व सर्व खेळाडू मधून आपल्या विद्यार्थ्यांनी पुन्हा एकदा इतिहास घडविले व दोन वेळेस आंतरराष्ट्रीय स्पर्धा मध्ये चॅम्पियनस टीम चे किताब पटकवले( काता. व कुमिते ) या दोन्ही परकर मध्ये विद्यार्थ्यांनी १७ स्वर्ण पदक ७ रजत पदक ६ कांस्य पदक असे एकूण ३० पदका ची कमाई केली पदक जिंकणारे सर्व विद्यार्थ्यांचे नाव. मुलींमध्य. भैरवी गोरे. भक्ती कोल्हे. श्रावणी मुजमुले. मुलांमध्ये. प्रेम काठोळे. रोहित धारक. मयूर कंकाळ. उदय ढेरे. अर्कम शेख. अफान शेख. आयान शेख. साद शेख. अर्शद सय्यद. साद सय्यद. गोविंद ढगे. वैभव साळवे. हे सर्व विद्यार्थी पुन्हा एकदा चॅम्पियन्स ठरले व या सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शक रेन्शी मजेद शेख सर. बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड होल्डर . यांनी मार्गदर्शन केले यांच्या यशबद्दल पालका वर्ग व माजलगाव च्या वतीने व संपूर्ण तालुका मध्ये कौतुक होत आहे व शुभेच्छा दिले जात आहे

## जरांगेंना परवानगी नाकारताच आव्हाड संतापले



मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे आता पुन्हा एकदा आक्रमक झाले आहेत. त्यांनी येत्या 29 ऑगस्टला कोणत्याही परिस्थितीत मुंबईवर धडकणारच अशी भूमिका घेतली आहे. मुंबई उच्च न्यायालयाने त्यांना मुंबईत आंदोलन करण्यास मनाई केल्यानंतर मात्र आता त्यांनी पुन्हा एकदा न्यायालयाचे दार ठोठवणार असल्याचे सांगितले. जरांगे यांना मुंबईत येण्यास मनाई करण्यात आल्यानंतर आता जास्तच वातावरण तापले आहे. जरांगेंनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर सडकून टीका केली आहे. दरम्यान, आता न्यायालयाच्या निर्णयानंतर शरद पवार यांच्या पक्षाचे नेते तथा माजी मंत्री जितेंद्र आव्हाड यांनीही आक्रमक पवित्रा धारण केला आहे. त्यांनी मराठ्यांना हे सरकार बदमान करत असल्याचा गंभीर आरोप केलाय.

## मुंबईच्या आंदोलनात लाखोंच्या संख्येने सहभागी व्हा – मराठा सेवक किरण भगत

बीड प्रतिनिधी :-दि.25 : चार दशकांचा मराठा आरक्षणाचा लढा आता निर्णायक टप्प्यावर पोहोचला आहे. या पार्श्वभूमीवर मुंबईत होणाऱ्या ऐतिहासिक मोर्चात मराठा समाज बांधवांनी लाखोंच्या संख्येत सहभागी व्हावे, असे आवाहन मराठा सेवक किरण भगत यांनी केले आहे. संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली अंतरवली सराटी येथून सुरू होणारा आणि मुंबईत दाखल होणारा हा मोर्चा मराठा समाजाच्या हक्कासाठी निर्णायक ठरणार आहे. दोन वर्षांपूर्वी जरांगेपाटील यांनी घेतलेल्या बेमुदत उपोषणामुळे शासनाला या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे लागले. त्यानंतर न्यायमूर्ती शिंदे समिती स्थापन झाली आणि तिच्या प्रयत्नांमुळे मराठवाड्यासह राज्यातील लाखो बांधवांना कुणबी प्रमाणपत्र मिळाले. यामुळे त्यांचा ओबीसी आरक्षणात समावेश झाला. तथापि, समितीच्या नोंदी शोध प्रक्रियेत अनेक गावांमध्ये विसंगती आढळली. काहींना प्रमाणपत्र मिळाले, तर काहींना प्रशासनाच्यानिष्काळजीपणामुळे अजूनही मिळालेले नाही. त्यामुळे समाजातील मोठा घटक आरक्षणापासून वंचित आहे. या सर्वांसाठी हैदराबाद गॅझेट बॉम्बे गॅझेट सातारा गॅझेट लागू करून आणि सगे-सोयर्यांच्या आधारे समावेश करण्याची ठाम मागणी संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटलांनी केली आहे. त्यामुळे ज्यांना जरांगे पाटलांच्या आंदोलनामुळे आधीच कुणबी आरक्षणाचा लाभ मिळाला आहे, त्यांनीही या निर्णायक लढाईत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन मराठा सेवक किरण भगत यांनी केले.








## मांजराचे पाणी नियोजन बध्द शेतकऱ्यांपर्यंत पोहच करू

### खा.बजरंग सोनवणे यांचे प्रतिपादन, जलपुजन कार्यक्रमाला शेतकऱ्यांची गर्दी

बीड: शेतीसाठी पाणी आवश्यक असते. यावर्षी मांजरा धरण वेळेत पुर्णक्षमतेने भरले असून भविष्यात मांजरा धरणाचे पाणी नियोजनबद्ध पद्धतीने शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी आणि परिसराच्या विकासासाठी मी सातत्याने प्रयत्नशील राहीन, असे प्रतिपादन खा.बजरंग सोनवणे यांनी केले. केज, अंबाजोगाई, धारूर, लातूर, कळंब या शहरासह ६१ गावांची तहान भागवणारे व मांजरा पट्ट्यातील पाच तालुक्यातील हजारो हेक्टर जमीन ओलिताखाली आणणारे केज तालुक्यातील धनेगाव येथील मांजरा धरण १०० टक्के भरले आहे. दि.२६ रोजी सकाळी १० वाजता खा.बजरंग सोनवणे यांच्या हस्ते जलपुजन करण्यात आले. जलपूजन प्रसंगी माजी आमदार पृथ्वीराज साठे, राजेसाहेब देशमुख, नरेंद्र काळे, प्रकल्प अधिकारी वर्ग, पंचायत समिती सदस्य, सरपंच, उपसरपंच, चेअरमन तसेच मोठ्या संख्येने शेतकरी बांधव उपस्थित होते.मांजरा धरण हे बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आयुष्याशी, शेतीशी आणि उपजीविकेशी घट्ट जोडलेले महत्त्वाचे धरण आहे. या धरणामुळे परिसरातील हजारो हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येते. दरवर्षी शेतकऱ्यांची पिकांची आशा या धरणाच्या पाण्यावरच अवलंबून असते. यंदा धरण पूर्ण क्षमतेने ऑगस्ट महिन्यातच भरल्यामुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि दिलासा दिसून येत आहे. मांजरा धरणाचे पाणी नियोजनबद्ध पद्धतीने शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी



आणि परिसराच्या विकासासाठी मी सातत्याने प्रयत्नशील राहीन, असा विश्वास यावेळी व्यक्त केला. मांजरा धरणातून लातूर शहर, लातूर औद्योगिक वसाहत, केज, अंबाजोगाई, धारूर, कळंब या शहराससह ६१ गावे मांजरा धरणातील पाणी पुरवठ्यावर निर्भर असतात. मांजरा धरण पिण्याचे पाण्याबरोबर शेती पिकांना लागणाऱ्या पाण्यासाठी देखील महत्त्वपूर्ण आहे. धरणाच्या डाव्या व उजव्या कालव्या अंतर्गत बीड, धाराशिव आणि लातूर जिल्ह्यातील ७३ गावातील १८ हजार २२३ हेक्टर शेतजमीन सिंचनाखाली येते. डावा कालवा ९० कि.मी. अंतराचा आहे. त्यातून १०,५५९ हेक्टर शेती तर, उजवा कालवा ७८ कि.मी.चा असून त्याअंतर्गत ७६६५ हेक्टर शेती सिंचनाखाली येते. खरीप, रब्बी व उन्हाळी हंगामासाठी सरासरी १८५ दलघमी पाण्याचा वापर होते. याशिवाय केज व कळंब तालुक्यातील २७ गावातील शेतकऱ्यांना मांजरा धरणाच्या बॅकवॉटर पाण्याचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष लाभ होतो, अशी माहिती यावेळी अधिकाऱ्यांनी उपस्थितांना दिली.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
बुधवार २७ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



संपादकीय

## तुमचे वजन वाढण्यास ही कृती पण कारणीभूत ठरते



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 15 ऑगस्टच्या स्वातंत्र्य दिनाच्या भाषणात देशासमोर वजन वाढीचे, लठ्ठपणाचे मोठे संकट उभे ठाकल्याचे म्हटले आहे. त्यामागे जंक्स फुड्सच नाही तर बदलेली जीवनशैली सुद्धा कारणीभूत ठरली आहे. कमी झालेली शारिरिक हालचाल, ताणतणाव आणि झोपेचे बिघडलेले गणित यामुळे लठ्ठपणा वाढत असल्याचे समोर आले आहे. लठ्ठपणा ही केवळ शारीरिक समस्या नाही तर अनेक आजारांचे मूळ कारण आहे. त्यातच लग्न आणि इतर समारंभात बुफे जेवणाचे लोण ग्रामीण भागापर्यंत पोहचले आहेत. त्यातील ही एक चूक अनेकांच्या लठ्ठपणासाठी कारणीभूत ठरली आहे. भारतीय संस्कृतीत जमिनीवर मांडी घालून जेवण करण्याची पद्धत आहे. त्यामुळे अन्न पचण करण्यास मदत होते. जमिनीवर बसून प्रार्थना केल्यानंतर जेवणाला सुरुवात करण्यात येते. पण आजकालच्या बुफे पद्धतीमुळे उभं राहुन जेवण करावे लागते. या पद्धतीमुळे पचनक्रियेवर परिणाम होतो. आणि वजन वाढण्याची शक्यता बळावते. लठ्ठपणामुळे लवकर येतो थकवा लठ्ठपणामुळे शरीरात अनेक समस्या तयार होतात. लठ्ठ व्यक्ती कोणतेही काम केल्यानंतर लगेच थकते याशिवाय अशा व्यक्तीला लवकर धाप लागते. सांधेदुखीचा आणि आत्मविश्वास डळमळीत होण्याचा त्रास जाणवतो. तर लठ्ठपणामुळे मधुमेह, उच्च रक्तदाब, ह्रदयविकाराचा झटका आणि इतर गंभीर आजारांचा धोका वाढतो. फास्टफूड पदार्थ, पॅकेटबंद पदार्थ, मायक्रोवेव्हमधील अन्न आणि फ्रीजमधील शीळे अन्न हे आरोग्यासाठी उपायकारक मानल्या जाते. तर वाईट व्यसनं, रात्री उशीरा जागरण, सकाळी उशीरा उठणे, सतत बसून राहणे, व्यायामाचा अभाव, वाईट सवयींमुळे लठ्ठपणा वाढतो. लठ्ठपणा असा घालवा लठ्ठपणा घालवण्यासाठी अगोदर जीवनशैलीत मोठे बदल करणे आवश्यक आहे. सकाळी लवकर उठा, रात्री लवकर झोपा, सयंत जीवनशैली अंगीकार करा. व्यायामवर जोर द्या. योग्य आणि सकस आहार करा. फळे, हिरव्या पालेभाज्या, कडधान्य आणि प्रथिने असलेल्या अन्न पदार्थांचा रोजच्या आहारात समावेश असावा. तळलेले पदार्थ, प्रिझर्व्हर्ड पदार्थ, पेय टाळा नियमित व्यायाम करा. किमान रोज 30 मिनिटे चाला अथवा धावा. सायकल चालवा. योग, प्राणायम करा. कसरत करा. ताणतणाव टाळा, हास्यविनोदाकडे वळा. पुस्तक वाचण वाढवा. झोपेची, सकाळी लवकर उठण्याची आणि जेवणाच्या वेळा पाळा. मोबाईल,टीव्हीत अधिक रमू नका. पुरेशी आणि गाढ झोप महत्त्वाची आहे.

# कलेच्या उपासनेत 'समर्पण' महत्वाचे – मनिष पंडित

"कलेची साधना आणि अभ्यास करताना 'समर्पण' महत्वाचे असते " असे मत डिजिटल क्षेत्रातील मार्गदर्शक मनिष पंडित यांनी व्यक्त केले. वादी स्कूल ऑफ म्युझिक अँड डान्स तर्फे आयोजित केलेल्या "समर्पण २०२५" या वार्षिक सोहळ्याच्या समारोपानंतर त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. या सोहळ्याचे कौतुक करतांना ते म्हणाले, "या सोहळ्याला 'समर्पण' हे नाव अगदी सार्थ आहे. वादी स्कूल ऑफ म्युझिक अँड डान्सचे विद्यार्थी 'समर्पण' भावाने कला जोपासत आहेत, मिळालेल्या प्रत्येक संधीचा उपयोग करून घेत आहेत, हे पाहून आनंद वाटतो. 'समर्पण २०२५' हा केवळ एक सांस्कृतिक सोहळा नव्हता, तर तो टीमवर्कचा एक सुंदर नमुना होता. सतेज सरांची सचोटी आणि विद्यार्थ्यांवर त्यांनी घेतलेली मेहेनत या कार्यक्रमातून दिसून आली. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणांमुळे प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले." अशा भावना मनिष पंडित यांनी व्यक्त केल्या.

वादी स्कूल ऑफ म्युझिक अँड डान्स तर्फे आयोजित "समर्पण २०२५" हा वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम नुकताच दादर-माटुंगा सांस्कृतिक केंद्रात मोठ्या उत्साहात पार पडला ज्यात बासरी वादन आणि नृत्याची विविध रूपं रसिकांसमोर सादर करण्यात आली.

वाद्यगुरु श्री सतेज करंदीकर यांनी स्वतः




पुढाकार घेत कार्यक्रमाचे नेतृत्व केले. त्यांच्या बासरीच्या मंत्रमुग्ध करणाऱ्या सादरीकरणाने संपूर्ण सभागृह स्तब्ध झाले. पखवाज आणि तबल्यासोबतची जुगलबंदी ही कार्यक्रमाची खास आकर्षण ठरली. त्यांच्या बासरीच्या मंत्रमुग्ध करणाऱ्या सादरीकरणास श्री किरण पाटील (तबला), निळोबा गोरठणकर (पखवाज) आणि अक्षय टकले (तानपुरा) यांची सुरेख साथ लाभली.

करंदीकर यांचे शिष्य आणि विद्यार्थ्यांनीही शास्त्रीय आणि चित्रपटसंगीतावर आधारित सादरीकरणे सादर केली, ज्यात बासरी, वेस्टर्न फ्लूट आणि गायनाचा सुरेख संगम पाहायला मिळाला. शिष्यांच्या या सादरीकरणाला तृप्तराज पांड्या (तबला) आणि अक्षय टकले (तानपुरा) यांनी साथ करत सादरीकारणांची गोडी वाढवली.

कथक नृत्यांगना दिशा देसाई यांनी रामायणातील 'सीता अपहरण' प्रसंगावर आधारित 'जटायू' नृत्यनाट्य सादर करून उपस्थितांचे मन जिंकले. त्यांच्या भावपूर्ण आणि तांत्रिक सादरीकरणानंतर प्रेक्षकांनी उभे राहून टाळ्यांचा वर्षाव केला. त्यांच्या या सादरीकरणात डॉ. रुपाली देसाई (पढ़ंत), श्रीरंग टेंबे (हार्मोनियम आणि गायन), जियोन मूखर्जी (बासरी) यांनी साथ दिली.

या कार्यक्रमाला ज्येष्ठ बासरीवादक विजय तांबे सर, कथक विशारद डॉ. रुपाली देसाई हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. इतर विशेष उपस्थितांमध्ये डिजिटल क्षेत्रातील मार्गदर्शक मनिष पंडित यांचा समावेश होता. विद्यार्थ्यांचे पालक, संगीतप्रेमी आणि स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. शरयू जाधव यांनी आपल्या सहज, भावस्पर्शी शैलीत या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. या सोहळ्यात सतेज करंदीकर यांच्या वेबसाईटचेही अनावरण करण्यात आले.

वादी स्कूल ऑफ म्युझिक अँड डान्सचे संस्थापक सतेज करंदीकर यांनी २०१९ पासून शास्त्रीय संगीताच्या प्रसारासाठी कार्यरत असून, ठाणे आणि दादर येथील केंद्रांमधून बासरी, तबला आणि गायनाचे प्रशिक्षण दिले जाते. सतेज करंदीकर हे पं. विवेक सोनार आणि पं. प्रविण गोडखिंडी यांचे शिष्य असून, त्यांना युथ गंधर्व पुरस्कार, स्वर साधना पुरस्कार अशा अनेक सन्मानांनी गौरवले गेले आहे.

"समर्पण २०२५" हा कार्यक्रम केवळ एक सांस्कृतिक सोहळा नव्हता, तर विद्यार्थ्यांच्या प्रतिभेला व्यासपीठ देणारा आणि रसिकांशी भावनिक नाळ जोडणारा एक अनुभव होता. सोहळ्यानंतर विद्यार्थ्यांच्या पालकांनी, श्रोत्यांनी आणि सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी उस्फुर्त प्रतिक्रिया देत सतेज सर आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे अभिनंदन केले. भारतीय संगीताचा वारसा पुढे नेण्यासाठी अशा प्रकारचे कार्यक्रम होत राहिले पाहिजेत अशी भावना या वेळी तिथे उपस्थित असलेल्या श्रोत्यांनी व्यक्त केली.

# गेवराई तालुक्यात प्रा. लक्ष्मण हाके यांच्या प्रतिमेस दुग्धाभिषेक

गेवराई ( प्रतिनिधी )दि. 26 गेवराई तालुक्यातील उमापुर येथे प्रा. लक्ष्मण हाके यांच्या प्रतिमेस दुग्धाभिषेक घालून संघर्ष योद्धे हाके साहेब यांचे मनोबल वाढवण्यासाठी सर्व ओबीसी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहात उमापूर येथील बस स्थानक या ठिकाणी त्यांच्या प्रतिमेस दुग्धाभिषेक घालून हाके साहेब तुम संघर्ष करो हम तुम्हारे साथ है, भुजबळ साहेब तुम संघर्ष करो हम तुम्हारे साथ है. अशा घोषणा देऊन सर्व परिसर दणाणून काढला होता.

ओबीसी आरक्षण मोरक्या प्रा. लक्ष्मण हाके यांच्या पुतळ्याचे आ. विजयसिंह पंडित यांच्या समर्थकांनी गेवराई येथे दहन केले होते तसेच काल प्रा. लक्ष्मण हाके यांच्या गाडीवर दगडफेक करण्याचा प्रयत्न केला होता त्याचा निषेध करून तसेच प्रा. लक्ष्मण हाके यांचे मनोबल वाढवण्यासाठी उमापूर तालुका गेवराई येथे वंचित बहुजन आघाडी बीड जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्र पोकळे यांच्या नेतृत्वाखाली सर्व ओबीसी बांधवांनी दुग्धाभिषेक घालण्याचे आयोजन केले होते. यावेळी बोलतांना काल दिनांक ची २४ रोजी काही फितूर झालेल्या ओबीसी बांधवांनी ओबीसी योद्धे लक्ष्मण हाके यांच्यावर कमेंट केल्या . ओबीसी बांधव नाही तर थोड्याफार चिरीमीरीसाठी



एखाद्या कामात टक्केवारी मिळण्यासाठी आपल्या नेत्याला खुश करण्यासाठी केलेल्या केविलवाणा प्रयत्न केला. आमदाराचे काही बांडगुळ चमचे तोंडसुख घेतांना दिसले हाके यांनी सर्व समाजबांधवातून निवडून गेलेल्या आमदाराला खडे बोल सुनावले होते, म्हणून आमदार व त्यांच्या चमच्यांच्या बुडाला आग लागली.निवडणुकीच्या वेळेस आमच्या दारात येतात तुम्हाला दांडा काढु असे वक्तव्य हाके यांनी केले होते यात गैर काय? अनेक मोर्चे,आंदोलने केली जातात त्यात सरकारविरुद्ध आसूड मोर्चा, रूमने मोर्चा काढल्या जातात . याचा अर्थ असा होतो का दांडक काढू म्हटल्याने लोकप्रतिनिधी आमदाराच्या चमच्यांनी गेवराईत हाके साहेबांचा पुतळा जाळावा . अगोदर ओबीसी मतांची भीक मागणारे आता हाके साहेबांवर ज्या अठरापगड जातीचे नेतृत्व करतात अशा माणसावर ज्यांना आपण आतापर्यंत मतदान करत आलोय,असा आमदार निवडून आल्यावर एका समाजाची बाजू घेतो . म्हणजे या आमदाराला ओबीसी इतर समाजातील मताची किंमत नाही का ? परंतु माझा ओबीसी बांधव अजूनही शांत असतो त्याला कसलेही देणे घेणे नाही आहे ओबीसींमधील काही लोक प्रस्थापितांच्या दावणीला बांधलेला आहे . आणि गुलामगिरीत जगतो आहे . अरे थोडी लाज वाटू द्या आपल्यासाठी आपले हाके साहेब संविधानिक मार्गाने आपले हक्क अधिकार सांगतात . परंतू काही जातीवादी बांडगूळ आणि निवडणूकी पुरते मतांची भीक मागणारे लोक आज आपल्या नेतृत्वावर बोलून आपल्या हक्कासाठी ' अठरापगड जातीसाठी लढतो ' ओबीसीचे हक्क आणि अधिकार टिकवण्यासाठी रस्त्यावर येतो अशा व्यक्तीमत्वावर आपलेच काही फितूर लोक आपल्याला काहीतरी मिळाव , आपल स्वतःच घर चालाव म्हणून अशा जातीवादी प्रस्थापित आमदाराच्या दावणीला आपलेच लोक बांधण्याचा प्रयत्न करतात . प्रा. लक्ष्मण हाके यांच्या विरोधात बोलणाऱ्या आमदारांनी दम असेल तर राजीनामा देऊन पुन्हा निवडणुकीला सामोरे जावे मग दाखव ओबीसींची ताकद काय आहे ते.

तुर्तास एक समाज बांधव म्हणून मला हाकेसाहेब व बळीराम तात्या खटके यांचा सार्थ अभिमान आहे . भुरट्यांना अवहान देत वाघासारखे गेवराईत दाखल झाले. हाके व खटके या दोघांनीही दाखवून दिले की यशवंतराव होळकरांचे रक्त लढाईत मागे सरत नाही .

हाकेसाहेब व बळीराम तात्या आपण आमच्या साठी नेहमी संघर्ष योध्दे ' मार्गदर्शक ' लढवये नेतृत्व आणि आमच्या सारख्याचे आधारवड आधारस्तंभ दैवत असताल राजेंद्र पोकळे यांनी मनोगत व्यक्त केले. ग्रा. पं. सदस्य बळीभाऊ कापसे,कृष्णा सामसे,ज्ञानेश्वर हवाले, भरत हवाले, विठ्ठल वीर, महेश काकडे, दत्ता वीर, ऋषिकेश वीर,किरण राऊत, प्रशांत कातखडे,ज्ञानेश्वर वीर, मच्छिंद्र लाळगे, दादा लाळगे,जालिंदर धापसे,शाम पोकळे, गणेश वीर,अंकुशराव वीर, बाबासाहेब वीर, सतिश वीर,विठ्ठल लाळगे,चंदू तळपे यांच्यासह शेकडो ओबीसी समाज बांधव उपस्थित होते.

# चलो मुंबई आंदोलनासाठी लिंबागणेश पंचक्रोशी सज्ज :- डॉ.गणेश ढवळे







लिंबागणेश : (दि.२६)मराठा आणि कुणबी समाज एकच असल्याची अंमलबजावणी, हैद्राबाद-सातारा-मुंबई गॅझेट लागू करणे, सरसकट गुन्हे मागे घेणे आणि कायद्यात बसणारे आरक्षण देणे या प्रमुख मागण्यांसाठी संघर्ष योद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली दि.२९ ऑगस्ट रोजी मुंबई आझाद मैदानावर होणाऱ्या ऐतिहासिक आंदोलनासाठी लिंबागणेश पंचक्रोशी सज्ज झाली आहे. बालाघाटावरील मराठा सेवकांनी गावोगावी जनजागृती मोहीम राबवून चावडी बैठका, गाठीभेटी घेऊन समाजबांधवांना एकवटले आहे.

### 58 लाख कुणबी नोंदींचा लाभ – सकळ मराठा समाज जरांगे पाटलांच्या पाठीशी : डॉ.गणेश ढवळे

मराठा समाजाला शिक्षण व नोकरीत आरक्षण मिळावे म्हणून मागील ४० वर्षांचा संघर्ष अखेर फलदायी ठरत असून आतापर्यंत ५८ लाख कुणबी नोंदी मिळाल्याने समाजाला मोठा फायदा झाला आहे. भविष्यात मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनामुळे कायमस्वरूपी आरक्षण मिळेल, या ठाम विश्वासाने मराठा समाज एकदिलाने मुंबई आंदोलनात सहभागी होणार असल्याचे डॉ.गणेश ढवळे यांनी सांगितले.

मुंबई आंदोलनासाठी वाहनव्यवस्था, खाद्यपदार्थ, बॅनर, झेंडे, वेशभूषा आदींची जय्यत तयारी करण्यात आली असून तरुणाईसह महिला, वयोवृद्ध यांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून येत आहे. या तयारीत कल्याण वाणी, मुरलीधर जाधव, रविंद्र निर्मळ, बाळासाहेब मोरे, रमेश पाटील, भगवान मोरे, विक्रम दाभाडे, पांडुरंग वाणी, महावीर जाधव, अशोक वाणी, औदुंबर नाईकवाडे, अर्जुन घोलप, मोहन कोटुळे, राजेंद्र ढास, सतिश वायभट, संजय पावले, रामचंद्र मुळे, आश्रुबा गिरे, अकबर सय्यद आदी कार्यकर्त्यांची विशेष उपस्थिती होती.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
बुधवार २७ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



## गाईचं की म्हशीचे नेमकं कोणतं दुध पचनासाठी ठरते फायदेशीर?



दूध हा आपल्या दैनंदिन आहाराचा एक महत्त्वाचा भाग आहे. लहान मुले असोत किंवा वृद्ध, डॉक्टरही दररोज दूध प्यावे असा सल्ला देतात. परंतु अनेकदा घरांमध्ये वादविवाद होतात की गाईचे दूध जास्त फायदेशीर आहे की म्हशीचे दूध. काहीजण म्हणतात की गाईचे दूध हलके आणि सहज पचण्याजोगे असते, तर काहीजण म्हशीचे दूध शक्तीचा खजिना मानतात. खरे सत्य काय आहे आणि कोणते दूध मूत्रपिंड आणि पचनासाठी चांगले आहे? हा असा प्रश्न आहे ज्याचे उत्तर शोधताना लोक गोंधळून जातात. गायीच्या दुधात चरबी आणि प्रथिनांचे प्रमाण म्हशीच्या दुधापेक्षा कमी असते. म्हणूनच ते हलके असते आणि सहज पचते. ज्यांना आम्लपित्त, गॅस किंवा पचनाशी संबंधित समस्या आहेत त्यांच्यासाठी गाईचे दूध चांगले मानले जाते. याशिवाय, त्यात व्हिटॅमिन ए आणि कॅल्शियम भरपूर प्रमाणात असते जे हाडे आणि डोळ्यांसाठी फायदेशीर आहे. म्हशीच्या दुधात जास्त चरबी आणि प्रथिने असतात. म्हणूनच ते क्रिमी आणि घट्ट असते. त्याची चव देखील गाईच्या दुधापेक्षा थोडी वेगळी आणि मनोरंजक असते. परंतु या कारणामुळे ते पचण्यास थोडे कठीण होऊ शकते. जे जिममध्ये जातात, जास्त काम करतात किंवा शरीरात ऊर्जा आणि स्नायू तयार करण्यासाठी जास्त प्रथिने आवश्यक असतात त्यांच्यासाठी म्हशीचे दूध चांगले मानले जाते. सफदरजंग रुग्णालयातील नेफ्रोलॉजी विभागाचे डॉ. अनुज मित्तल स्पष्ट करतात की म्हशीच्या दुधात जास्त प्रथिने असतात आणि त्यामुळे मूत्रपिंडांवर भार पडू शकतो, विशेषतः ज्यांच्या मूत्रपिंड आधीच कमकुवत आहेत. दुसरीकडे, गाईचे दूध हलके असते आणि त्यात कमी प्रथिने असल्याने मूत्रपिंडांवर दबाव पडत नाही. यामुळेच डॉक्टर बहुतेकदा मूत्रपिंडाच्या रुग्णांना गाईचे दूध पिण्याचा सल्ला देतात. जर तुम्हाला दूध पिल्यानंतर जडपणा, गॅस किंवा अपचन जाणवत असेल तर गाईचे दूध तुमच्यासाठी चांगले आहे. ते लवकर पचते आणि पोटावर भार पडत नाही. दुसरीकडे, जर तुम्ही निरोगी असाल आणि पचनक्रियेत कोणतीही समस्या येत नसेल तर तुम्ही म्हशीचे दूध देखील आरामात पिऊ शकता. गायीचे किंवा म्हशीचे दूध कोणते निवडावे? आता प्रश्न असा आहे की तुम्ही कोणाचे दूध प्यावे. उत्तर अगदी सोपे आहे, ते तुमच्या गरजा आणि आरोग्यावर अवलंबून आहे. जर तुम्हाला हलके, सहज पचणारे दूध हवे असेल किंवा तुमचे मूत्रपिंड कमकुवत असतील तर गाईचे दूध चांगले आहे. पण जर तुम्हाला ताकद, उर्जेची गरज असेल आणि शरीर सौष्ठव सारख्या क्रियाकलाप कराल तर म्हशीचे दूध तुमच्यासाठी अधिक फायदेशीर आहे. दूध निवडताना, केवळ चवच नाही तर तुमचे आरोग्य आणि गरजा देखील लक्षात ठेवा.

# पर्यावरणपूरक व डीजेमुक्त गणेशोत्सव साजरा करण्यावर भर द्यावा–जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड दि.२८ऑगस्ट पासून गणपती उत्सवास प्रारंभ होत असून, यावर्षीचा गणेशोत्सव पर्यावरणपूरक व डीजेमुक्त करण्यावर भर द्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते. बैठकीस जिल्हा पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधिक्षक सुरज गुरव, अतिरिक्त मनपा आयुक्त गिरीश कदम, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, डॉ. शंकरराव चव्हाण महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख तसेच विविध संबधीत विभागाचे अधिकारी यांची उपस्थिती होती. मनपा, महावितरण, सार्वजनिक बांधकाम विभागांनी यांनी त्यांच्या स्तरावरील कामे दिलेल्या निर्देशानुसार विहित वेळेत पूर्ण करावीत. यावेळेस गणपती विसर्जनाच्या दिवशी जीवरक्षकांची संख्या वाढविण्यात आली असून स्वयंसेवकांचे सहाय्य घेण्यात येणार आहे. तसेच मनपाच्यावतीने तीसऱ्या, पाचव्या दिवशी गणेश मुर्तीचे संकलन करण्यात येणार असून, लहान घरघुती गणपती विसर्जन करण्यासाठी छोटे छोटे पर्यावरणपूरक कुंड तयार करण्यात आले आहेत. नागरिकांनी नदीच्या पात्रात गणपती विसर्जन न करता मनपाच्यावतीने



तयार करण्यात आलेल्या पर्यावरण पूरक तलाव व कुंडातच गणपती विसर्जन करुन सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले आहे. नदीच्या वाहत्या प्रवाहात श्री गणेश मुर्तीचे विसर्जन न करता मनपाच्यावतीने विसर्जनासाठी तयार केलेल्या सांगवी, पासदगाव, पुयनी, झरी येथे कृत्रिम तलावाची व्यवस्था केली आहे. याबाबत नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन मनपाच्यावतीने केले आहे.

नागरिकांनी कायदा व सुव्यवस्था राखावी डिजेमुक्त गणेशोत्सव साजरा करण्यावर भर द्यावा -पोलीस अधिक्षक आज पासून गणेशोत्सवास प्रारंभ होत असून या काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासनाच्यावतीने पूर्ण नियोजन केले आहे. उत्सव काळात येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी नागरिकांनी पोलीस प्रशासनास सहकार्य करावे. पोलीस प्रशासन नेहमी दक्ष असून नागरिकांनी योग्य माहिती द्यावी. नागरिकांनी कायदा हातात घेऊ नये, कायदा व सुव्यवस्था अबाधित राहील यांची दक्षता घ्यावी असे आवाहन पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी केले.

# जि. प. माध्यमिक शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण सोहळा संपन्न!

सौताडा ( प्रतिनिधी) सविस्तर वृत्त असे की पाटोदा तालुक्यातील जिल्हा परिषद माध्यमिक शाळा सौताडा ही शाळा नावाजलेली व गुणवंत विद्यार्थ्यांची शाळा म्हणून या शाळेचा नावलौकिक संपूर्ण तालुक्यात आहे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त तसेच क्रांतीसुर्य मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त व शरद पवार विचार मंच यांच्या वतीने विविध शालेय व बौद्धिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते व त्यानिमित्त बक्षीस वितरण समारंभ मोठ्या उत्साहात व जिल्हा संपन्न झाला. शालेय विद्यार्थ्यांना कौतुकाची थाप मिळावी व नवचेतना नव प्रेरणा मिळावी यासाठी सौताडा ग्रामस्थ , विविध राजकीय सामाजिक कार्यकर्ते,मराठा सेवक समिती , शिक्षणप्रेमी यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये भरगच्च बक्षीस वितरण कार्यक्रम जिल्हा परिषद शाळेच्या मुख्य प्रांगणात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री गणेश बेद्रे सर व प्रमुख पाहुणे म्हणून कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती किरण शिंदे पाटील, सरपंच महादेव घुले,सुभाष टेकाळे, परसराम गायकवाड, अण्णासाहेब शिंदे दत्तात्रय टेकाळे, बापूसाहेब टेकाळे, अभिमान शिंदे, दत्ता शिंदे अण्णासाहेब टेकाळे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष माणिकराव



सानप, मराठा सेवक महेश पेचे, सिताराम पेचे, भाऊ राजे शिंदे , रिपब्लिकन पँथर सेना अध्यक्ष प्रदीप उबाळे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ शिक्षक संदीप यांनी केले तर आभार प्रदर्शन संदिप जावळे सर यांनी केले .तसेच या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले किरण शिंदे पाटील यांनी विद्यार्थ्यांना विस्तृत असे मार्गदर्शन केले .विद्यार्थ्यांनी वाचन संस्कृती विकसित केल्याशिवाय आपण कोणत्याही स्पर्धेमधून विजेते ठरणार नाहीत व आपला स्पर्धा परीक्षेत कस लागणार नाही व आपण उत्तम विद्यार्थी म्हणून घडणार नाही. प्रत्येक विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर टाळावा व वाचनाकडे आपले लक्ष केंद्रित करावे अशा प्रकारचे मार्मिक प्रबोधन सर्व विद्यार्थ्यांना सभापती किरण शिंदे पाटील यांनी केले .या प्रसंगी दत्ता शिंदे यांनी सांगितले की ,कोणतेही थोर विभूती समाजसुधारक घडले जात नाहीत . त्यासाठी सतत संघर्ष करावा लागतो. क्रांतीसुर्य मनोज जरांगे पाटील हे संघर्षातुन उभे राहिलेले समाजमान्य नेतृत्व असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले. स्पर्धा परीक्षेत सातत्याने प्रयत्न करावे लागतात कोणत्याही क्षेत्रात नाव कमवायचे असेल तर त्याला प्रयत्न ,चिकाटी , संघर्ष याशिवाय पर्याय नसल्याचे उदगार दत्ता शिंदे यांनी बोलताना काढले. शाळेचा दिवसेंदिवस जिल्हास्तरावर तसेच तालुकास्तरावर विविध स्पर्धांच्या माध्यमातून वाढत चाललेला नावलौकिक हा शाळेच्या वैभवशाली इतिहासामध्ये भर टाकणारा ठरत आहे. जिल्हा परिषद शाळेतील सर्वच शिक्षक हे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारे असल्यामुळे विद्यार्थ्यांचा विविध स्पर्धेमध्ये तालुक्यामध्ये गौरव होत असल्याचे ज्येष्ठ शिक्षक संदिपान रानमारे सर यांनी सांगितले .सौताडा ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांना वाचन संस्कृती व वाचनाची गोडी लागण्यासाठी प्रयत्न करण्यासाठी व लोक चळवळ उभी करावी अशा प्रकारची सूचना रानमारे सर यांनी मांडली. ज्येष्ठ शिक्षक फुले सर यांच्या सेवापूर्तीनंतर सौताडा शाळेला रुजू झालेले चित्रकला अंशकालीन कला निदेशक श्री अमोल शिंदे सर यांच्या मुळे चित्रकलेला सुगीचे दिवस आलेले आहेत. श्री शिंदे सर नेहमी विद्यार्थ्यांच्या चित्रकला या विषयाला वेळ देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असतात व अध्यापन करत असतात त्याचाही परिणाम म्हणून चित्रकलेमध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर विद्यार्थ्यांनी विविध बक्षिसांची लूट केलेली आहे. तसेच क्रीडा निदेशक बांगर सर यांचाही शाळेच्या विकासामध्ये विद्यार्थ्यांच्या क्रिडा स्पर्धेसाठी मार्गदर्शन असते.शाळेतील सर्वच शिक्षक अध्यापनाचे काम इमानेइतबारे करत आहे त्याला विद्यार्थी व पालकांनी साथ दिली तर अध्यापनाचे चिज होईल अशी भावना या निमित्ताने दिसून आली . या स्पर्धेमधून अनेक विद्यार्थ्यांना बक्षिसे प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली .अतिशय उत्साहात खेळीमेळीच्या वातावरणात बक्षिस वितरण व शैक्षणिक साहित्य वाटप सोहळ्याचा कार्यक्रम पार पडला. हा बक्षीस वितरण सोहळा पार पाडण्यासाठी जेष्ठ शिक्षक संदिपान रानमारे सर , आव्हाड सर, सरोदे सर, दहिफळे सर, जावळे सर, शिंदे सर, शेख सर, बांगर सर, मोरे सर,अमोल शिंदे सर, दिलीप बांगर सर, सरोदे मॅडम ,बहिर मॅडम, ऐश्वर्या मस्के, कोठुळे मॅडम , नागरगोजे मॅडम आदींनी मेहनत व सहकार्य केले.

# नांदेड – मुंबई वंदे भारत एक्सप्रेसचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून शुभारंभ

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : मराठवाड्याचे मागासलेपण दूर करण्यासाठी शासन येथील गतिमान दळणवळणावर भर देत आहे.वंदे भारत एक्सप्रेस ने नांदेड राजधानी मुंबईच्या अधिक जवळ आले असून यामुळे निश्चितच मराठवाड्याच्या समृद्धीचे द्वार उघडले आहे, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.नांदेड - मुंबई वंदे भारत एक्सप्रेसचा नांदेड रेल्वे स्थानकावरून शुभारंभ करण्यात आला. या रेल्वे गाडीचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रालयातून ऑनलाइन पद्धतीने हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ केला. मंत्रालयात आयोजित कार्यक्रमाला सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर-साकोरे, मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक धर्मवीर मीना, प्रधान मुख्य परिचालन अधिकारी श्याम सुंदर गुप्ता, मुख्य प्रशासकीय अधिकारी (बांधकाम) अवनीश कुमार पांडे, विभागीय प्रबंधक हिरेश मीना आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारतीय रेल्वे कात टाकत आहे. प्रगत देशांसारखे आरामदायक सुविधा असलेली भारतात निर्मित वंदे भारत रेल्वे ही त्याचेच प्रतीक आहे. मुंबई ते नांदेड हे 610 किलोमीटरचे अंतर 9 ते 9.30 तासात पूर्ण होणार आहे. पूर्वी जालनापर्यंत धावणारी वंदे भारत आता हुजूर साहिब नांदेड पर्यंत जात आहे. या रेल्वे गाडीची



क्षमता 500 वरून 1440 पर्यंत वाढवण्यात आली आहे. तसेच गाडीचे डब्बे 8 वरून 20 पर्यंत वाढवण्यात आले आहे.नांदेड हे शिख धर्मियांचे महत्त्वाचे श्रद्धास्थान आहे. त्यामुळे येथे येणाऱ्या भाविकांना, प्रवाशांना वेगवान व आरामदायी प्रवासाची अनुभूती 'वंदे भारत' एक्सप्रेसच्या माध्यमातून होणार आहे. वंदे भारत एक्सप्रेसच्या सुखकर, सुरक्षित आणि आरामदायी प्रवासासाठी मराठवाड्यातील जनतेचे अभिनंदनही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी केले. नांदेड येथील रेल्वे स्थानकावर आयोजित कार्यक्रमप्रसंगी खासदार अशोक चव्हाण, खासदार डॉ.अजित गोपछडे, आमदार विक्रम काळे, जिल्हाधिकारी राहुल कर्डीले, नांदेड परिक्षेत्राचे पोलिस उपमहनिरीक्षक शहाजी उमाप, पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार, रेल्वेचे अतिरिक्त महाव्यवस्थापक सत्यप्रकाश, विभागीय रेल्वे व्यवस्थापक प्रदीप कामले, गुरुद्वारा लंगर साहिबचे संत बाबा बलविंदरसिंघजी, पत्रकार, नागरिक आदीची उपस्थिती होती. यावेळी उपस्थित

# मंत्रीमंडळ बैठकीत टाकळगाव बॅरेजच्या कामास मंजुरी, आ. विजयसिंह पंडित यांच्या पाठपुराव्याला यश

चकलांबा दि.१ (प्रतिनिधी) ÷ गेवराई विधानसभा निवडणुकी दरम्यान सिंदफणा नदीवरील टाकळगाव कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्याचे बॅरेजमध्ये रुपांतर करण्याचे काम करू असा शब्द जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांनी दिला होता. त्यांनी दिलेला शब्द खरा करून दाखविला आहे. मागील अनेक वर्षांपासून अमरसिंह पंडित आणि आमदार म्हणून निवडून आल्यानंतर विजयसिंह पंडित यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले असून मंत्रीमंडळ बैठकीत टाकळगाव बॅरेजच्या कामास मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे सिंदफणा काठावरील सिंचन क्षेत्रात भरीव वाढ होणार असल्याची माहिती आ. विजयसिंह पंडित यांनी देवून महायुती सरकारचे त्यांनी आभार व्यक्त केले आहेत. गेवराई सारख्या सततच्या दुष्काळग्रस्त तालुक्यात



## निवडणूक प्रचारात दिलेला ' शब्द ' अमरसिंह पंडित यांनी पाळला

### गेवराई तालुक्यात विकासाची कामे फक्त अमरसिंह पंडित करू शकतात राष्ट्रवादीचे युवा नेते विष्णू खेडकर चकलांबा

सिंचन सुविधा वाढाव्यात यासाठी जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांनी संधी मिळेल तेथे प्रयत्न केले. गोदावरी प्रमाणे सिंदफणा नदीपात्रात सुध्दा बारमाही पाणी असावे यासाठी त्यांनी शासन दरबारी पाठपुरावा केला. विधानसभा निवडणुकीत टाकळगाव को. प. बंधाऱ्याचे बॅरेजमध्ये रुपांतर करण्याचे आश्वासन आ. विजयसिंह पंडित यांच्या जाहिरनाम्यात देण्यात आले होते. आ. विजयसिंह पंडित यांच्या प्रयत्नांमुळे याकामी मंगळवार, दि. १ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत टाकळगाव बॅरेजच्या कामास १९.६६ कोटी रुपये अंदाजित किंमतीसाठी राज्य शासनाने प्रशासकीय मान्यता प्रदान केली होती. त्यानंतर पुढील आवश्यक कार्यवाही करून जलसंपदा विभागाने राज्य मंत्रिमंडळ बैठकीत सादर केलेल्या प्रस्तावानुसार मंगळवार दिनांक २६ ऑगस्ट रोजी टाकळगाव बॅरेजच्या कामास अंतिम मान्यता देण्यात आली आहे. या कामाच्या निविदा प्रक्रिया सुरू करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. सिंदफणा नदीवरील इतर सर्व बॅरेजची कामे सुद्धा लवकरच मंजुर होतील असा विश्वास आ. विजयसिंह पंडित यांनी व्यक्त केला आहे. टाकळगाव बॅरेजमुळे परिसरातील शेकडो एकर जमीन ओलिताखाली येणार आहे. टाकळगाव, हिरापूर, पिंपळगाव कानडा, औरंगपूर कुक्कडा, कोपरा, दगडगाव, पारगाव जप्ती, हिंगणी हवेली, नांदुर हवेली यांसह परिसरातील गावांच्या सिंचनासाठी या बॅरेजचा फायदा होणार आहे. बीड आणि गेवराई तालुक्यातील सिंदफणा नदीकाठच्या गावांनाही त्याचा लाभ होईल. मंत्रीमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयानंतर गेवराई विधानसभा मतदार संघाचे आमदार विजयसिंह पंडित यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार व्यक्त केले. टाकळगाव व परिसरातील ग्रामस्थांनी आनंद व्यक्त करून आ. विजयसिंह पंडित व अमरसिंह पंडित यांचे आभार मानले.

## सरपंच रुद्रा कदम यांचे कडून साखर वाटून आनंद व्यक्त

सिंदफणा नदीपात्रात टाकळगाव येथे नवीन बॅरेजेचे काम मंजुर झाल्याबद्दल टाकळगाव ग्राम पंचायतीचे सरपंच रुद्रा कदम व त्यांच्या सहकाऱ्यांनी गावात डफडे वाजवून साखर वाटप करत आनंद व्यक्त केला. त्यांनी जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित आणि आ विजयसिंह पंडित यांचे आभार मानले. ग्रामस्थ आणि शेतकरी यांनी राज्य मंत्रिमंडळाच्या निर्णयाचे स्वागत केले आहे.



दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
बुधवार २७ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



# वैष्णोदेवी मार्गावर दरड कोसळली

# 5 भाविकांचा मृत्यू, 14 जखमी

जम्मू-कश्मीरातील त्रिकूट पर्वतावर स्थित माता वैष्णो देवी मंदिराला जाणाऱ्या मार्गावर मंगळवारी भूस्खलन होऊन दरड कोसळल्याने मोठा अपघात घडला आहे. अर्धकुवांरी स्थित इंद्रप्रस्थ भोजनालयाजवळ ही दरड कोसळल्याने यात पाच भाविकांचा मृत्यू झाला आहे. तर 14 भाविक जखमी झाले आहेत. घटनास्थळी रेस्क्यू ऑपरेशन सुरु आहे. ढीगाऱ्याच्या खाली आणखी काही भाविक अडकलेले असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. जम्मू-काश्मीरातील अनेक भागात सलग तीन दिवस मुसळधार पाऊस कोसळत असल्याने ही त्रिकूट पर्वतात ही दरड कोसळण्याची घटना घडली आहे. जम्मूच्या संभागमध्ये जोरदार पावसाने आतापर्यंत आठ जणांचे मृत्यू झाले आहेत. यात पाच भाविकांचा समावेश असून ते माता वैष्णोदेवीच्या दर्शनाला आले होते.येथे 24हून अधिक घरे आणि पुल क्षतिग्रस्त झाले होते. जम्मूमध्ये सर्व जलाशय धोक्याच्या पातळीपेक्षा जास्त वाहत आहेत.



त्यामुळे शहरातील अनेक सखल भागात पाणी साचून जनजीवन विस्कळीत झाले आहे. मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला यांनी म्हटले आहे की जम्मू संभाग येथील काही ठिकाणची परिस्थिती बिकट झालेली आहे. आपण स्वत: स्थितीवर लक्ष ठेवण्यासाठी श्रीनगरातून येणाऱ्या विमानाने जम्मूला जाणार आहेत असे मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला यांनी म्हटले आहे.

### हायवेवरील ट्रॅफीक बंद, यात्रा स्थगित

जम्मू-श्रीनगर आणि किश्तवाड-डोडा राष्ट्रीय महामार्गावरील दळणवळण थांबवण्यात आले आहे. तर काही पर्वतातील मार्ग दरडी कोसळल्याने किंवा पुरामुळे मार्ग बंद झाले आहेत. पावसामुळे सुरक्षेचे पाऊल म्हणून वैष्णोदेवी यात्रा तात्पुरती थांबवण्यात आली आहे. विविध घटनात गंदोहमध्ये दोन आणि ठाठरीमध्ये एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे.जेव्हा 15 घरे आणि चार पुल क्षतिग्रस्त झाला आहे. आता अर्द्धकुंवारी येथे पाच लोकांचा मृत्यू झाल्याचे उघड झाले आहे.

## कवीवर्य साहेबराव नंदन तात्या यांची पोलीस मित्र नाशिक शहर सदस्य पदी निवड

पिंपळनेर [ प्रतिनिधि ] भारत सरकार नोंदणीकृत रजि.नं २०८६ ८४ सेक्शन ८ एल.आय.सी. अन्याय अत्याचार भ्रष्टाचार विरुद्ध लढणारे, माहितीचा अधिकार प्राप्त करून देणारे, हक्काचे व्यासपीठ असलेल्या युवा क्रांती फौंडेशन अंतर्गत पोलीस मित्र पत्रकार ग्राहक संरक्षण आणि माहितीचा अधिकार संघटेच्या पोलीस मित्र नाशिक शहर सदस्यपदी कवी लेखक संपादक साहेबराव नंदन उर्फ तात्या यांची निवड झाल्याचे ओळखपत्र नुकतेच साहेबराव नंदन तात्यांना प्राप्त झाले आहे.योग्य व्यक्ति योग्य निवड सार्थकी ठरेल अशा प्रतिक्रिया विविध स्तरातून व्यक्त होत आहेत. साहेबराव नंदन तात्या हे मुळ बागलाण तालुका ताहाराबाद येथील असून. गेल्या वीस वर्षा पासून नाशिक येथे स्थाईक असून, खाजगी सेवा स्वेच्छानिवृत्ती नंतर, सामाजिक, साहित्यिक, अध्यात्मिक क्षेत्रात कार्यरत असून, सेवाभावी निर्गवी व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख आहे. साहित्य क्षेत्रात राज्यस्तरीय अनेक नामांकित बहुसंख्य संस्थांचे पुरस्कार्थी आहेत. मराठी , आहिराणी ,कविता, अलक, लघुकथा लेखन हा त्यांचा हातखंडा आहे. गावकुसाच्या शेतीमाती , नाती




गोती त्यांचा आवडीचा विषय आहे. त्यांच्या नावे अनेक कविता, लेख, शिवाय सगर साहित्य निर्मितीचे अनेक अंक ,प्रसिद्ध आहेत. राज्यस्तरीय अनेक पुरस्कार प्राप्त गावगाडा काव्यसंग्रह, परिसस्पर्श कादंबरी हे त्यांचे साहित्य मैलाचा दगड ठरले आहेत. त्यांना साहित्य क्षेत्रात गावगाडाकर, तात्याश्री म्हणून ओळखतात . त्यांच्या निवडीचे सर्वच क्षेत्रातून अभिनंदन होत असून कौतुकाचा शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. विशेषतःहा सगरवंशिय जिरे माळी समाजातून आनंद व्यक्त करण्यात येत असल्याचे समजते.

### भूम पोलीस स्टेशन येथे ईद ए मिलदुन्नबी यानिमित्त शांतता कमिटीची बैठक पार पडली



(भूम प्रतिनिधी नय्युम बेग ) इस्लाम धर्म चे सर्वश्रेष्ठ हजरत मोहम्मद पैगंबर जयंती निमित्त ईद-ए-मिलाद साजरी केली जाते इस्लाम धर्माच्या साजरा होणारे ईद-ए-मिलाद जयंती निमित्त भूम पोलीस स्टेशनमध्ये शांतता कमिटीची बैठक पार पडली यावेळी भूम पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक कानगुडे साहेब जिल्हा शांतता कमिटी सदस्य व भाजपा अल्पसंख्याक मोर्चा जिल्हा सरचिटणीस आदम शेख भाजपा कामगार मोर्चा जिल्हाध्यक्ष रोहन जाधव भूम भाजपा अल्पसंख्यांक शहराध्यक्ष मेहबूब शेख पत्रकार अब्बास सय्यद पत्रकार वसीम काजळेकर पत्रकार शब्बीर सापवाले यांच्यासह हिंदू मुस्लिम बांधव उपस्थित होते

### अवयवदान जनजागृती साठी खास टेबल

लालबागचा राजाच्या इथे गणेशोत्सवाच्या दहा दिवसात अवयवदान देहदान जनजागृती आणि रजिस्ट्रेशन साठी खास टेबल ठेवण्यात येणार असून ज्या लोकांना अवयवदान देहदानासाठी नावनोंदणी करायची आहे ते गणेशभक्त या ठिकाणी नावनोंदणी करू शकतात आणि यासाठी मंडपाजवळ दहा दिवस एका खास टेबलाचे आयोजन करण्यात येणार आहे.आजही अनेक नागरिकांना अवयवदान देहदान यांबद्दल पुरेशी माहिती नसल्याने किंवा म्हणावे तेवढे ते लोक जागरूक नसल्याने मनात इच्छा असून देखील अवयवदाना पासून वंचित राहतात.खरतर सध्या अनेक रुग्ण अवयवाच्या प्रतीक्षेत असून त्यांना वेळेवर अवयव उपलब्ध होत नसल्याने हलाखीचे जीवन जगत आहेत.अवयवदान करण्यासाठी सर्वप्रथम आपल्या नातेवाईकांच्या होकारानुसार ना हरकत प्रमाणपत्र घेऊन फॉर्म भरायचा असतो.फक्त ब्रेन डेड परिस्थितीतच अवयव घेतले जातात.नैसर्गिक मृत्यूत आपण त्वचा आणि डोळे दान करू शकतो. लालबाग च्या राजाने अवयवदान जनजागृती आणि नावनोंदणी साठी केलेली व्यवस्था कोणतेही गणपती मंडळ अथवा नवरात्रोत्सव मंडळ आपल्या ठिकाणी करू शकते.
गणेश हिरवे

## लोकनेत्या ना.पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वामुळे आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघात भाजपचे दोन जिल्हाध्यक्ष पद

### निष्ठावंत कार्यकर्त्यांना न्याय दिल्याने सर्वत्र आनंदाचा माहोल

पाटोदा (गणेश शेवाळे) भूतो ना भविष्य असे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस व लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांच्या लोकाभिमुख नेतृत्वामुळे भारतीय जनता पार्टीने आष्टी, पाटोदा, शिरुर मतदारसंघाला न्याय देत दोन भारतीय जनता पार्टीच्या जिल्हाध्यक्ष पदांची संधी उपलब्ध करून दिली आहे. पक्षश्रेष्ठींनी घेतलेल्या या ऐतिहासिक निर्णयामुळे सर्वसामान्य व निष्ठावंत



कार्यकर्त्यांना न्याय मिळाल्याची भावना व्यक्त होत असून कार्यकर्त्यांमध्ये



प्रचंड आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.पक्षांतर्गत संघटनात्मक न्याय साधत जिल्हाध्यक्ष पदाच्या या दुहेरी नियुक्त्यांमुळे कार्यकर्त्यांच्या मनातील अपेक्षा पूर्ण झाल्या आहेत. कार्यकर्त्यांच्या आवाजाला योग्य न्याय देत घेतलेल्या या निर्णयामुळे भाजप अधिक बळकट होईल, असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.या ऐतिहासिक पावलाबद्दल पक्षश्रेष्ठींना व लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांना कार्यकर्त्यांकडून मन:पूर्वक धन्यवाद देण्यात येत आहेत.

# ॲड.उमाकांत आदमाने यांना राष्ट्रीय भारत भुषण पुरस्कार 2025 प्रदान

साऊ ज्योती सामाजिक फाउंडेशन या महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या विचारांची देवाण घेवाण व्हावी आणि देशपातळीवर प्रसार प्रचार करत असलेल्या संस्थेने नुकत्याच गुणवंतासाठी जाहीर केलेल्या पुरस्कारांच्या नामांकात आलेल्या पुणे येथील सुप्रसिद्ध कवी, साहित्यिक, निवेदक ॲड.उमाकांत मधुकर आदमाने, नोटरी भारत सरकार यांना साहित्य, शिक्षण व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल दि. २४ ऑगस्ट २०२५ रोजी भारतीय इतिहास संशोधन मंडळ, पुणे या ठिकाणी मा.श्री.विष्णु देशमुख (पोलीस निरीक्षक), मा.श्री. हिमांशु जैन (राष्ट्रीय खेळाडू), बॉलीवूड अभिनेत्री चित्र दीक्षित, अभिनेत्री भक्ती साधू, मा. प्रबोधनकार श्री. सचिन देवरे, लावण्यवती पुजा माळी, डॉ.विद्याश्री येमचे आणि संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. श्री. सचिन हळदे सर, मुख्य आयोजक मा. श्री. विकास उबाळे यांच्या हस्ते साहित्य “राष्ट्रीय भारत भुषण पुरस्कार २०२५” आकर्षक सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, देऊन प्रदान करण्यात आला. पुणे येथील कवी, साहित्यिक, निवेदक मा. ॲड. उमाकांत आदमाने (नोटरी, भारत सरकार) यांनी या अगोदर अनेक जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय, राष्ट्रीय स्तरावर निवेदकाची भूमिका बजावत कवी प्रेमींना आपल्या आवाजाच्या जादूने मंत्रमुग्ध केलेले आहे. कवी ॲड. उमाकांत मधुकर आदमाने मूळ गाव बोरगाव काळे, जिल्हा लातूर सध्या स्थायिक पुणे येथून विविध सामाजिक, शैक्षणिक, व साहित्यिक चळवळीत सक्रीय आहेत. कवी ॲड. उमाकांत मधुकर आदमाने हे सन २००९ पासून शिवाजीनगर जिल्हा सत्र न्यायालय, पुणे येथे वकीली व्यवसाय करीत असून सन २०२० मध्ये त्यांची भारत सरकार नोटरीपदी निवड झालेली असून नोटरी व्यवसाय सुद्धा प्रामाणिक पणे करीत आहेत, वकिली




व्यवसाया बरोबरच त्यांनी लॉकडाऊनच्या काळात साहित्य विश्वात यशस्वी प्रवास करत या अगोदर साहित्य क्षेत्रात ९५ व्या अ.भा. मराठी साहित्य संमेलन, उदगीर, जि. लातूर येथे शांता शेळके कवी कट्टा वर आई या विषयावरील कविता मोठ्या दिमाखात सादर केली होती, ९६ व्या अ.भा.मराठी साहित्य संमेलन, वर्धा येथे प्रा. देविदास सोटे कवी कट्टा वर नुसत्या तुझ्या असण्याने, आई या विषयावरील कविता मोठ्या दिमाखात सादर केली होती, व ९७ व्या अ.भा.मराठी साहित्य संमेलन, अमळनेर, जळगाव येथे प्रेमकविता मोठ्या आनंदाने सादर केली, व ९८ व्या अ.भा.मराठी साहित्य संमेलन, दिल्ली येथे “ शोध “ नावाची कविता सादर केली त्यामुळे साहित्यिक क्षेत्रात देखील आपला ठसा प्रामाणिकपणे उमटविला आहे, अनेक जिल्हास्तरीय,राजस्तरीय,राष्ट्रीय स्तरावर काव्यसंमेलनात सहभाग घेऊन त्यांनी आपल्या कविता सादर केल्या.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com